Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com



दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | रविवार , 04 ऑक्टोबर 2026 | अंक क्र. 142 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

आपल्याकडे काही न्युज सबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा. मो. 8421577797 आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

# वारसा सेवेचा , तळमळ विकासाची, जोड संवेदनशीलतेची : परळीकरांच्या विश्वासाला मिळाले पद्मश्री नेतृत्व !

## सेवेचा वारसा, विकासाची तळमळ आणि संवेदनशील नेतृत्व अशी पद्मश्रीताई धर्माधिकारी यांची सार्वजनिक जीवनातील ओळख

ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथाच्या पावन नगरीच्या विकासाच्या वाटचालीत लोकप्रतिनिधित्वाची भूमिका ही केवळ पदापुरती मर्यादित नसते. नागरिकांच्या अपेक्षा समजून घेणे, शहराच्या प्रश्नांची नाडी ओळखणे आणि उपलब्ध साधनसामग्रीतून विकासाला दिशा देणे, हे त्यामागचे खरे आव्हान असते. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांचा आत्तापर्यंतचा सार्वजनिक जीवनातील प्रवास पाहता, सामाजिक बांधिलकी आणि शहराच्या विकासाचा ध्यास या दोन बाबी ठळकपणे समोर येतात.सेवेचा वारसा , विकासाची तळमळ, अभ्यासू संवेदनशील नेतृत्व त्यांच्या माध्यमातून परळीला मिळाले आहे. परळीकरांच्या विश्वासाला खऱ्या अर्थाने 'पद्मश्री' मिळाली असल्याचा सकारात्मक आशावाद निर्माण झाला आहे. तमाम परळीकरांचे अतिशय जबाबदारीने, विकासाची नवी दृष्टि आणि नवी दिशा घेऊन प्रथम नागरीक म्हणून प्रतिनिधित्व करणाऱ्या परळीच्या नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांचा आज (४ऑक्टोबर) वाढदिवस. त्यानिमित्त त्यांचे मनस्वी अभिष्टचिंतन!!!

माजी नगराध्यक्ष बाजीराव (भैय्या) धर्माधिकारी यांच्या सुविद्य पत्नी अशी ओळख असलेल्या सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांची आज एक अभ्यासू,संवेदनशील, प्रसंगी खंबीर व लोकांप्रती समर्पित नेतृत्व, लाघवी संवाद या माध्यमातून लोकप्रिय,लोकाभिमुख नगराध्यक्षा अशी स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. परळी नगरीचे नगराध्यक्षपद महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाले. त्यावेळी अश्वासक व विश्वसनीय चेहरा म्हणून राजकारणात जनतेची नाडी ओळखण्याचे कसब असलेल्या महायुतीचे नेते आ.धनंजय मुंडे व ना. पंकजाताई मुंडे यांनी तमाम परळीकरांच्या मनातील नाव नगराध्यक्ष पदासाठी पुढे आणले. सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांना या दोन दिग्गज नेतृत्वाने एक जबाबदारी आणि दृढ विश्वास अपेक्षित धरत संधी दिली. परळीकर जनतेने या विश्वासावर आपल्या भरघोस मतांची मोहर उमटवली. सार्वजनिक जीवनातील हा टप्पा माजी नगराध्यक्ष बाजीराव (भैय्या) धर्माधिकारी यांच्या लोकप्रिय नेतृत्वाला पत्नी नव्हे तर एक निष्ठावान कार्यकर्तीप्रमाणे दिलेली साथ आणि सामाजिक उपक्रमांमधील सहभाग हा त्यांच्या सार्वजनिक वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा ठरला असल्याचे दिसून येते.

उच्च शिक्षणाची पार्श्वभूमी, सामाजिक कार्याची जाण आणि कुटुंबातून मिळालेली सेवाभावी संस्कारांची शिदोरी, या बळावर पद्मश्रीताईंनी सार्वजनिक जीवनात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. महिला, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि सामाजिक उपक्रमांशी जोडलेला त्यांचा सहभाग, परळीतील प्रत्येक समाजघटक व प्रत्येक सुख दुखात प्रामाणिकपणे सहवेदना ही त्यांच्या वाटचालीची एक बाजू आहे; तर नगराध्यक्षा म्हणून शहराच्या प्रशासकीय आणि विकासात्मक प्रश्नांना सामोरे जाणे, कधी सुसंवादातून तर कधी कठोर होत खंबीरपणे परळीकर नागरीककेंद्रीत भूमिका ही त्यांच्या जबाबदारीची दुसरी अधोरेखित होणारी प्रभावी बाजू आहे. शहराचा कारभार जवळून पाहताना शहराच्या प्रश्नांची गुंतागुंत, नागरिकांच्या अपेक्षा आणि प्रशासनाची कार्यपद्धती यांची त्यांना झालेली ओळख त्यांच्या सार्वजनिक भूमिकेसाठी उपयुक्त ठरली आहे.

राजकारणात उतरताना एखादी महिला आरक्षित जागेसाठी म्हणून जेव्हा उमेदवारी करत असते त्यावेळेला महिला ही नाममात्र असेल बाकी नेतृत्व पुरुषच करतील असा एक दृढ समज समाजामध्ये रुजलेला आहे. हा समज पद्मश्रीताईंनी आपल्या आतापर्यंतच्या वाटचालीत हा एक गैरसमज असल्याचेच सिद्ध केले आहे. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातूनही परळीच्या नगराध्यक्षांची ही अभासी नव्हे तर एका सक्षम महिलेची कर्तृत्ववान वाटचाल सार्वजनिक जीवनातील महिलांसह सर्वांसाठीच एक प्रेरक उदाहरण ठरली आहे .मात्र, केवळ कुटुंबाच्या कार्यपरंपरेचा वारसा म्हणून नव्हे, तर स्वतःच्या सामाजिक जाणिवेतून काम करण्याचा त्यांचा प्रयत्न त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची स्वतंत्र ओळख अधोरेखित करतो.

नगराध्यक्षपद म्हणजे केवळ मिळालेली प्रतिष्ठेची संधी नाही तर शहराच्या विकासाला गती देण्याची जबाबदारी, जनतेच्या अपेक्षा, विश्वास जिंकण्याचे आव्हान आहे.त्या पातळीवर खरे उतरण्याची प्रामाणिक स्वयं धडपड सातत्याने दिसून येते.

नगराध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यापासून ते आजतागायत शहराच्या विकासाला गती देण्याची भूमिका त्यांनी सातत्याने मांडली आहे. नगरपरिषदेच्या अर्थसंकल्पीय नियोजनात स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, दिवाबत्ती, आरोग्य आणि आर्थिक शिस्त यांसारख्या विषयांवर भर देण्याची जनताभिमुख प्रखर भूमिका त्यांनी घेतल्याचे दिसून येते. विकासकामांच्या आढाव्यापासून ते लोककल्याणकारी उपक्रमांपर्यंत नगरपरिषदेच्या विविध कार्यक्रमांत त्यांची सक्रिय उपस्थिती दिसून आली आहे. महिला सक्षमीकरण हा त्यांच्या कार्यातील महत्त्वाचा विषय राहिला आहे. महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे असावी यासाठी परळी शहरात पाच स्वतंत्र महिला स्वच्छतागृहांचे बांधकाम सुरू केले. अलीकडेच महिला शेतकरी प्रमाणपत्राच्या नोंदणीबाबत त्यांनी पात्र महिलांना आवाहन केले. महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक कागदपत्रे आणि प्रशासकीय प्रक्रियेबाबत जागरूकता निर्माण करण्यावरही त्यांनी भर दिला. नगराध्यक्षा म्हणून महिलांसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि सन्मानजनक नागरी सुविधा निर्माण करणे, महिला आणि युवकांना संधी उपलब्ध करून देणे, हा त्यांच्या विकासदृष्टीचा महत्त्वाचा भाग राहिला असल्याचे दिसून येते.

परळीचा विकास केवळ सिमेंट- काँक्रीटच्या कामांपुरता मर्यादित नसून, शहराचा पर्यावरणीय, सामाजिक आणि सांस्कृतिक चेहराही तितकाच महत्त्वाचा आहे, अशी भूमिका त्यांच्या सार्वजनिक मांडणीतून दिसून येते. नगर परिषदेच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या परळी शहरातील अपूर्ण इमारती पूर्णत्वास नेऊन कार्यान्वित करण्याची त्यांची धडपड डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालय सुरू करण्याच्या निमित्ताने दिसून आली. वाचन संस्कृतीला बळकटी आणि एक ज्ञानमंदिर कार्यान्वित व्हावे हा ध्यास त्यांनी नगराध्यक्ष पद स्वीकारल्यापासूनच घेतला होता. परळीच्या धार्मिक आणि ऐतिहासिक ओळखीचा वारसा जपत आधुनिक नागरी सुविधांची उभारणी करणे, स्वच्छता आणि पर्यावरणाला प्राधान्य देणे, डिजिटल सुविधांना चालना देणे आणि नागरिकांचा प्रशासनातील सहभाग वाढवणे, हा त्यांच्या विकासदृष्टीचा केंद्रबिंदू राहिला आहे. पर्यावरणीय संरक्षणाचेही महत्त्व राखत त्यांनी उपलब्ध पाणी वितरण व्यवस्था बळकट करण्यावर भर दिला. अगोदरच शहरात विंधन विहिरींमुळे चाळणी झालेल्या भूभागाची आणखी चाळणी होऊ नये यासाठी पाणी वितरण व्यवस्थेला बळकटी देत एकही विंधन विहीर नगर परिषदेला घेण्याची गरज भासू नये याची काटेकोर उपाय योजना केली. त्याचबरोबर दुष्काळजन्य परिस्थिती लक्षात घेता खंबीर भूमिका घेत वाण प्रकल्पातील एक एक थेंब पाणी वाचविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचा त्यांनी आग्रह धरला. यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा करून प्रशासनाला आपल्या खंबीर भूमिकेने पाणीसाठा वाचविणे व संरक्षित करण्यासाठी भाग पाडले. नगराध्यक्षपदाची खरी कसोटी कार्यालयातील निर्णयांपेक्षा नागरिकांच्या प्रश्नांपर्यंत पोहोचण्यात असते. त्यामुळे नागरिक, व्यापारी, महिला, युवक, नगरसेवक, अधिकारी आणि विविध सामाजिक घटक यांच्याशी संवाद ठेवणे ही त्यांच्या कार्यशैलीतील महत्त्वाची बाब ठरत आहे. नगरपरिषद ही केवळ कर वसुली किंवा नागरी सुविधा देणारी संस्था न राहता नागरिकांच्या अपेक्षांना प्रतिसाद देणारी लोकाभिमुख संस्था व्हावी, हा दृष्टिकोन त्यांच्या भूमिकेतून सातत्याने पुढे येतो. सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांच्या सार्वजनिक जीवनातील जनसंपर्क, सातत्याने जनतेत मिसळणे , सुसंस्कृत व सुसंवाद या जमेच्या बाजू ठरल्या आहेत. आज परळीच्या विकासाचे त्यांचे मोठे स्वप्न व प्रमाणिक प्रयत्न आहेत.शहराचे सर्वांगीण विकासात्मक नियोजन यासह प्रत्येक क्षेत्रात त्यांच्याकडून अपेक्षा मोठ्या आहेत. या अपेक्षांना विकासकामांची जोड देत, संवेदनशीलता, संवाद आणि प्रशासकीय शिस्त या त्रिसूत्रीच्या माध्यमातून परळीच्या विकासाला नवी दिशा देण्याची जबाबदारी त्यांच्यासमोर आहे.ती जबाबदारी तळमळीने पार पाडण्यासाठी अविरत मेहनत घेतांना दिसत आहेत. यासाठी लक्षावधींचे आशिर्वाद त्यांच्या पाठिशी आहेत.त्यांच्या या प्रयत्नांना सुयश लाभो आणि परळीसाठी त्यांचे नेतृत्व एक सकारात्मक, सुसंस्कृत आणि सुसंवादी ठरो हीच प्रभू वैद्यनाथ चरणी प्रार्थना. वाढदिवसानिमित्त सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांना मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांच्या पुढील सार्वजनिक वाटचालीसाठी उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि यश लाभो, हीच सदिच्छा.

**- प्रा. रविंद्र जोशी (पत्रकार, परळी वैजनाथ.)**

**'पद्मश्री' नेतृत्व**



**सेवेचा वारसा, विकासाची तळमळ**



**परळीच्या सर्वांगीण विकासाचे मोठे स्वप्न आणि त्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न**



**नगरपरिषद ही केवळ प्रशासकीय संस्था न राहता लोकाभिमुख संस्था व्हावी, हा दृष्टिकोन**

# वेस्ट इंडिज विरुद्धच्या वनडे मालिकेत रोहित-विराट रचणार विक्रम

■ मुंबई वृत्तसंस्था

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात तीन सामन्यांची वनडे मालिका होणार आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना पुन्हा एकदा मैदानात पाहण्याची संधी त्याचे चाहते आणि क्रीडाप्रेमी यांना मिळणार आहे. या मालिकेतील पहिला सामना 27 सप्टेंबर रोजी खेळवला जाणार असून, या सामन्यात भारतीय संघाचे दोन्ही दिग्गज फलंदाज प्लेइंग 11 चा भाग असणार आहेत. या पहिल्याच सामन्यात हे दोन्ही स्टार खेळाडू आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दोन ऐतिहासिक विक्रम रचण्याच्या वेशीवर उभे आहेत. दरम्यान, रोहित शर्मा या मालिकेत खेळेल की नाही याबाबत बरीच चर्चा रंगली होती. पण लॉर्ड्सवर रंगलेल्या इंग्लंडविरुद्धच्या शेवटच्या वनडे सामन्यात त्याने शतक ठोकलं आणि टीकाकारांची तोंडं बंद केली होती. आता तशाच कामगिरीची अपेक्षा वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे मालिकेत आहे.



## विराट कोहली 15 हजारांचा टप्पा गाठणार

■ विराट कोहली क्रिकेट जगतात नवा इतिहास रचण्यासाठी सज्ज झाला आहे. विराट कोहलीला एकदिवसीय क्रिकेटमध्ये 15,000 धावा पूर्ण करण्यासाठी अवघ्या 59 धावांची गरज आहे. वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या सामन्यात त्याने ही कामगिरी केल्यास, महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरनंतर वनडे क्रिकेटमध्ये 15 हजार धावा करणारा दुसरा फलंदाज ठरेल. विराट कोहलीने आपल्या 314 वनडे सामन्यांच्या कारकिर्दीत 15,903 चेंडूंचा सामना करत 14,941 धावा कुटल्या आहेत. यादरम्यान तो 47 वेळा नॉट आऊट राहिला असून 18 वेळा शून्यावर बाद झाला आहे. त्याने आपल्या फलंदाजीच्या जोरावर 54 शतके आणि 79 अर्धशतके ठोकली असून यामध्ये 1,389 चौकार आणि 172 षटकारांचा समावेश आहे.

## रोहित शर्माला `12 हजारी` क्लबचे वेध

■ रोहित शर्मादेखील एका मोठ्या विक्रमाच्या जवळ पोहोचला आहे. रोहित शर्माला एकदिवसीय क्रिकेटमध्ये 12,000 धावांचा टप्पा पूर्ण करण्यासाठी आता केवळ 105 धावांची आवश्यकता आहे. रोहित शर्माने आतापर्यंत खेळलेल्या 288 वनडे सामन्यांमध्ये 12,784 चेंडूंचा सामना करत 11,895 धावा केल्या आहेत. रोहित शर्मा आपल्या कारकिर्दीत 37 वेळा नॉट आऊट राहिलेला रोहित 16 वेळा शून्यावर बाद झाला आहे. त्याने वनडे क्रिकेटमध्ये 34 शतके, 62 अर्धशतके आणि तब्बल 3 द्विशतके ठोकण्याचा अनोखा विश्वविक्रम केला असून त्याच्या नावावर 1,125 चौकार आणि 369 षटकार नोंदवले गेले आहेत. 27 सप्टेंबर रोजी होणाऱ्या या पहिल्या सामन्यात हे दोन्ही फलंदाज नवा इतिहास रचणार का, याकडे चाहत्यांचे डोळे लागले आहेत.

# लोक तुझा तिरस्कार करतील : वीरेंद्र सेहवाग

■ मुंबई वृत्तसंस्था

वीरेंद्र सेहवागचा मुलगा आर्यवीर सध्या क्रिकेट जगतात चर्चेचा विषय आहे. भारतासाठी अंडर 19 संघात त्याची निवड झाली असून वनडे मालिका खेळाल. त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध एकूण 109 धावा केल्या. त्याच्या या कामगिरीमुळे त्याच्यात वीरेंद्र सेहवागच्या आक्रमक शैलीची झलक दिसत असल्याची प्रतिक्रिया क्रीडा जगतात उमटल्या आहे. अनेकांनी त्याच्या आक्रमक फलंदाजीचं कौतुक केलं आहे. असं असताना वडील या नात्याने वीरेंद्र सेहवागने मुलगा आर्यवीर याला सल्ला दिला आहे. सेहवागने सांगितलं की, या मालिकेपूर्वीच मी आर्यवीरल एक सल्ला दिला होता. त्याला सांगितलं होतं की बिनधास्तपणे खेळ.. मोठ्या धावसंख्येची चिंता अजिबात करू नको. इतकंच काय तर त्याला सांगितलं होत की, लोकं तुझ्यावर प्रेम करतील आणि तुझा तिरस्कारही करतील. लोकांच्या या गोष्टींवर कोणतीच प्रतिक्रिया द्यायची नाही.

### आर्यवीर सेहवागची कामगिरी

■ आर्यवीर सेहवागची अंडर 19 भारतीय संघात निवड झाली आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या मालिकेत खेळण्याची संधी मिळाली. त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध तीन सामन्यात 109 धावा केल्या. यावेळी त्याचा स्ट्राईक रेट 100 हून अधिक होता. पण दुर्दैवाने त्याला अर्धशतकी कामगिरी करता आली नाही. तिसऱ्या सामन्यात 47 धावांवर असताना बाद झाला.



### वीरेंद्र सेहवाग काय म्हणाला?

वीरेंद्र सेहवागने एका मुलाखतीत सांगितलं की, 'मला आर्यवीर सेहवागचा अभिमान वाटतो. मी त्याला स्पष्ट सांगितलं आहे की दबाव तर असतोच, पण मैदानावर निर्भयपणे खेळ. मोठी धावसंख्या उभारण्याची चिंता करू नको. जर तू निर्भयपणे खेळला तर मोठी धावसंख्या आपोआप होईल. जर तू मोठ्या धावसंख्येबाबत विचार करत राहिला तर मला नाही वाटत की मोठी धावसंख्या होईल.' वीरेंद्र सेहवाग पुढे म्हणाला की, 'मी आर्यवीर सांगितलं आहे की, लोकं तुझ्यावर प्रेम करतील, लोकं तुझ्यावर टीका करतील, तुझा तिरस्कार करतील, पण त्यावर कोणतीच प्रतिक्रिया द्यायची नाही. तू जे काही करत आहेस त्यावर खूश राहायचं.'

वीरेंद्र सेहवागने आर्यवीरला सांगितलं की, 'जर तू धावा केल्या तर तर समजून जायचं की तू चांगली कामगिरी केली आहे. जर तू चांगल्या धावा करू शकला नाहीस तर समजून जायचं की चांगली कामगिरी करत नाहीस. त्यामुळे लोकं काय म्हणतात याचा विचार करण्यापेक्षा आपल्या सरावावर लक्ष केंद्रीत करात. त्यांना जे काही म्हणायचं आहे ते म्हणू दे. तू तुझ्या खेळावर लक्ष केंद्रीत कर.'

# सीमा कुमारीची ऐतिहासिक कामगिरी! महिलांच्या 10,000 मीटर शर्यतीत पटकावले कांस्यपदक

■ नागोया (जपान) :

जपानमधील नागोया येथे सुरू असलेल्या 2026 च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताच्या खेळाडूंनी आपली चमकदार कामगिरी सुरूच ठेवली आहे. अटीतटीच्या आणि रोमहर्षक झालेल्या महिलांच्या 10,000 मीटर धावण्याच्या शर्यतीत भारताच्या सीमा कुमारी हिने उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन करत कांस्यपदक आपल्या नावावर केले. तिच्या या शानदार विजयामुळे भारताच्या ॲथलेटिक्स पदकांच्या खात्यात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

शर्यतीच्या सुरुवातीपासूनच आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ धावपटूंचे मोठे आव्हान होते. विनफ्रेड यावी आणि नोझोमी तनाका यांच्यात सुवर्ण आणि रौप्य पदकांसाठी अत्यंत चुरशीची लढत पाहायला मिळाली. असे असतानाही, भारतीय धावपटू सीमा कुमारी शेवटच्या टप्प्यापर्यंत पदकाच्या शर्यतीत अत्यंत आत्मविश्वासाने टिकून राहिली. शर्यतीच्या अखेरच्या क्षणी तिने आपल्या मागे असलेल्या इतर स्पर्धकांना मागे टाकत आपले तिसरे स्थान अगदी पक्के केले आणि देशाची मान अभिमानाने उंचावली.



या शर्यतीत विनफ्रेड यावी हिने 32:39.18 मिनिटांची उत्कृष्ट वेळ नोंदवत सुवर्णपदक पटकावले, तर जपानच्या नोझोमी तनाकाने 32:41.54 मिनिटांच्या वेळेसह दुसरे स्थान मिळवून रौप्यपदक आपल्या देशाच्या झोळीत टाकले. भारताच्या सीमा कुमारीने या कठीण अंतिम फेरीत 32:50.05 मिनिटांची उल्लेखनीय वेळ देत कांस्यपदकावर आपले नाव कोरले.

### अवघ्या काही अंतराने हुकले पदक

■ दुसरीकडे, याच स्पर्धेतील महिलांच्या तिहेरी उडी (Triple Jump) प्रकारात भारताच्या आशा इलांगोचे पदक अतिशय थोडक्यात हुकले. तिला चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले, तर याच प्रकारात भारताच्या निहारिका वशिष्ठ हिने 10 व्या स्थानावर आपली स्पर्धा पूर्ण केली. आशा इलांगोने या प्रकारात 13.83 मीटरची सर्वोत्तम उडी मारत थेट चीनची कांस्यपदक विजेती खेळाडू ली यी हिच्या कामगिरीशी बरोबरी साधली होती. मात्र, नियमांनुसार होणाऱ्या 'काऊंटबॅक'च्या निकषात तिचा पदकाचा मार्ग रोखला गेला. आशाची दुसऱ्या क्रमांकाची सर्वोत्तम कामगिरी 13.65 मीटर होती, जी ली यीच्या 13.79 मीटरच्या कामगिरीपेक्षा किंचित कमी पडली. तिचा सहावा आणि अंतिम प्रयत्न 13.59 मीटरचा राहिला.



# वैभव सूर्यवंशीने उडवली होती गौतम गंभीरची झोप, रात्रभर विचारात गुंतला!

■ मुंबई प्रतिनिधी

एशियन गेम्स स्पर्धेसाठी भारतीय संघ श्रेयस अय्यरच्या नेतृत्वात जापानमध्ये आहे. वैभव सूर्यवंशीही एशियन गेम्स स्पर्धा खेळण्यासाठी जापानमध्ये संघासोबत आहे. मात्र त्याला प्लेइंग 11 मध्ये संधी मिळेल की नाही हे सांगणं कठीण आहे. दुसरीकडे, प्रशिक्षक गौतम गंभीर वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी भारतात आहे. असं असताना वैभव सूर्यवंशीमुळे टीम इंडियाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरची रात्रीची झोप उडाली होती. त्याचं कारणही तसंच होतं. याबाबतचा खुलासा खुद्द गौतम गंभीर याने केला आहे. त्याने इंग्लंड दौऱ्यात काय झालं होतं? याबाबत सांगताना हा खुलासा केला. इंग्लंड दौऱ्यात एक निर्णय घेताना त्याच्या मनाची घालमेल झाली होती. क्रिकेट कारकिर्दीतील सर्वात कठीण निर्णय असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. या निर्णयाच्या मुळाशी वैभव सूर्यवंशी होता. त्यामुळे त्याला रात्रभर झोप लागली नाही. वेस्ट इंडिजविरुद्ध वनडे मालिकेपूर्वी प्रशिक्षक गौतम गंभीर याने जियो हॉटस्टारशी संवाद साधला. गौतम गंभीरने सांगितलं की, इंग्लंड दौऱ्यात संजू सॅमसनला बसवून वैभव सूर्यवंशीला खेळवणं हा कोचिंग करिअरमधील सर्वात कठीण निर्णय होता. या निर्णयामुळे रात्रभर झोप लागली नाही. इंग्लंड दौऱ्यातील पाच सामन्यांच्या टी20 मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताचा पराभव झाला. त्यानंतर संजू सॅमसनला बसवून वैभव सूर्यवंशीला संधी दिली गेली. पण हा निर्णय का घेतला? याबाबत सांगताना गौतम गंभीर म्हणाला की, वैभव सूर्यवंशी फॉर्मात होता आणि भारताला ही मालिका जिंकायची होती. पण संजू सॅमसन टी20 वर्ल्डकप स्पर्धेत प्लेयर ऑफ द टूर्नामेंट होता, त्यामुळे हा निर्णय घेताना कठीण गेलं. पण या निर्णयाबाबत प्रामाणिकपणे संजू सॅमसनशी चर्चा केली होती, असंही गंभीर पुढे म्हणाला.

गौतम गंभीरने सांगितलं की, प्रशिक्षकाच्या दोन वर्षाच्या कारकिर्दीतील ती सर्वात कठीण रात्र होती. मी रात्रभर झोपू शकलो नाही. मी याबाबत संजू सॅमसनला सांगितलं होतं. संजूने हा निर्णय समजून घेतला आणि निवांतपणे मान्यही केलं. ही चर्चा फक्त संजू आणि माझ्यात झाली होती. या मालिकेनंतर संजू सॅमसन भारतीय संघ अफगाणिस्तानविरुद्ध टी20 मालिका खेळला. या मालिकेत वैभव सूर्यवंशी ऐवजी संजूला संधी दिली गेली. त्या संधीचं संजू सॅमसननं सोनं केलं आणि 2 अर्धशतकं ठोकली. इतकंच काय तर अफगाणिस्तानला क्लिन स्विप दिला.



# किंग कोहली अडचणीत? वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्याच सामन्यात होऊ शकतो हा मोठा अनर्थ!

■ मुंबई वृत्तसंस्था

वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे मालिकेला 27 सप्टेंबरपासून सुरूवात होणार आहे. या मालिकेसाठी टीम इंडिया सज्ज असून जोरदार सराव सुरू आहे. या सामन्याता सर्वांच्या पुन्हा एकदा विराट कोहली आणि रोहित शर्माच्या कामगिरीकडे लागून आहे. कारण या मालिकेतील कामगिरीवरून पुन्हा एकदा आकलन केलं जाणार आहे. पुढच्या वर्षी होणाऱ्या वनडे वर्ल्डकप स्पर्धेसाठी या दोन्ही खेळाडूंचा फॉर्म महत्त्वाचा आहे. दुसरीकडे, या मालिकेपूर्वी विराट कोहलीच्या चाहत्यांच्या कपाळावर आठ्या पडल्या आहेत. त्याला कारणही तसंच आहे. विराट कोहली वेस्ट इंडिजविरुद्धच्या मागच्या दोन वनडे मालिकांमध्ये फेल गेला होता. आता पुन्हा तसंच झालं तर सुमार कामगिरीची हॅट्ट्रीक होईल. मागच्या दोन वनडे मालिकेतील कामगिरी पाहिल्यानंतर तुमच्या लक्षात येईल.

### वेस्ट इंडिजविरुद्ध विराट कोहलीची बॅट शांत?

विराट कोहलीने वेस्ट इंडिजविरुद्ध 2022 मध्ये वनडे मालिका खेळली होती. तेव्हा तीन सामन्यातील तीन डावात फक्त 26 धावा करू शकला होता. तेव्हा विराट कोहलीची सरासरी फक्त 8.66 इतकी होती. तर 2019 मध्ये पार पडलेल्या वनडे मालिकेतील तीन सामन्यात त्याने फक्त 89 धावा केल्या होता. तेव्हा विराट कोहलीची सरासरी 29.6 होती. वेस्ट इंडिजविरुद्धच्या सहा सामन्यात विराट कोहलीची कामगिरी काही खास राहिली नाही. त्यामुळे विराट कोहलीच्या चाहत्यांसाठी वेस्ट इंडिज मालिका वाईट स्वप्नासारखं आहे. आता विराट कोहली सुमार कामगिरीची हॅट्ट्रीक करतो की त्यावर मात करतो हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

### विराट कोहली जबरदस्त फॉर्मात

विराट कोहली यावर्षी शेवटची वनडे मालिका इंग्लंडविरुद्ध खेळला होता. तेव्हा त्याने जबरदस्त कामगिरी केली होती. विराट कोहलीने कार्डिफमध्ये 65 आणि लॉर्ड्सवर 74 धावांची खेळी केली होती. त्यामुळे विराट कोहली फॉर्मात हे स्पष्ट दिसत आहे. विराट कोहली फॉर्मात असला की काय होतं हे सांगायला नको. त्याने मागच्या सहा सामन्यात 64 च्या सरासरीने 384 धावा केल्या आहेत. यात त्याने एक शतक आणि तीन अर्धशतकं ठोकली आहेत. त्यामुळे विराट कोहली मागच्या दोन वनडे मालिकेत हिशेब चुकता करेल असंच दिसत आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)



# राष्ट्रवादी काँग्रेसकडून परळी विधानसभा मतदारसंघ विशेष सखोल पुनरीक्षण (S.I.R.) अभियानासाठी समन्वयकांची नियुक्ती

परळी : मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एस.आय.आर.) कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्या आदेशानुसार विधानसभा मतदारसंघ निहाय समन्वयकांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये बीड जिल्ह्यातील अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या २३३ - परळी विधानसभा मतदारसंघासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने एकूण चार प्रमुख समन्वयकांची नियुक्ती केली आहे.एस.आय.आर संदर्भात पक्षाची परळी मतदारसंघाची जबाबदारी पुढील नेत्यांवर सोपवण्यात आली आहे.श्री. राजाभाऊ पौळ ( परळी तालुका ) ,श्री. राजाभाऊ औताडे (अंबाजोगाई ग्रा.),अ‍ॅड. गोविंद फड (परळी ता.),श्री. बाजीराव धर्माधिकारी (परळी शहर), या सर्व समन्वयकांवर आगामी काळात परळी विधानसभा क्षेत्रात मतदार याद्यांचे अचूक सक्षमीकरण करणे, नवीन मतदारांची नोंदणी आणि विशेष पुनरीक्षण अभियान यशस्वीपणे राबवण्याची महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या निवडी बद्दल माजी मंत्री तथा परळी विधान सभा आमदार धंनजय मुंडे यांनी अभिनंदन करत शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

# आष्टीत अवैध दारू विक्रीसह जुगारावर पोलिसांची धडक कारवाई ; ४ गुन्हे दाखल





## जुगाराच्या ठिकाणाहून २७ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल, तर तीन ठिकाणच्या दारू विक्रीत १७ हजार ९१० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**आष्टी | प्रतिनिधी**

आष्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीत विनापरवाना अवैध दारू विक्री आणि जुगाराविरोधात पोलिसांनी धडक कारवाई करत चार गुन्हे दाखल केले आहेत. २ ऑक्टोबर रोजी दिवसभर करण्यात आलेल्या या कारवाईत जुगाराच्या ठिकाणाहून रोख रक्कम, पत्ते व मोबाईल असा २७ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल, तर तीन ठिकाणी सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीत एकूण १७ हजार ९१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आष्टी शहरातील जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे काही इसम गोलाकार बसून पैशांवर तिरट नावाचा पत्त्यांचा जुगार खेळत असल्याची माहिती प्रभारी अधिकारी तथा परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांना मिळाली होती. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक वाघमारे व पोलीस कर्मचाऱ्यांनी पंचांसह दुपारी १२.५० वाजता छापा टाकला. यावेळी सादिक शब्बीर शेख, बाळू साहेबराव वाघमारे, पंकज रघुनाथ साबळे, बाबासाहेब गंगाराम शिकारे आणि हरीभाऊ श्रीपती अनारसे, सर्व रा. केरूळ, ता. आष्टी, यांच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

यानंतर चोभा निमगाव शिवारातील कडा-मिरज रस्त्यालगत असलेल्या हॉटेल काळेश्वरी येथे विनापरवाना देशी-विदेशी दारूची विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सायंकाळी ६.३० वाजता छापा टाकला. या कारवाईत ५ हजार १०० रुपयांची दारू जप्त करून सुरज सुभाष मुरकुटे (वय २५, रा. चोभा निमगाव) याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

तसेच नांदा शिवारातील नांदा मळा येथील हॉटेल रानवारा येथे विनापरवाना देशी-विदेशी दारू विक्री सुरू असल्याचे आढळून आले. पोलिसांनी सायंकाळी ७.५० वाजता केलेल्या कारवाईत ११ हजार ५६० रुपयांची दारू जप्त केली. याप्रकरणी राजेंद्र बापुराव काळे (वय ५६, रा. फत्तेवडगा, ता. आष्टी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

मांडवा येथील विराज किराणा दुकानातही विनापरवाना देशी दारूची विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सायंकाळी ६.३० वाजता छापा टाकून १ हजार २५० रुपयांची देशी दारू जप्त केली. याप्रकरणी सचिन नवनाथ मुटकुळे (वय २०, रा. मांडवा, ता. आष्टी) याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आष्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारू विक्री करणारे हॉटेल व धाबे चालक तसेच पत्ते, जुगार व मटका खेळणाऱ्यांची गोपनीय माहिती घेऊन यापुढेही कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजीत खुळे आणि प्रभारी अधिकारी भारत पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# " खोटं बोल पण रेटून बोल " हेच बाळासाहेब आजबेंचे धोरण

## अब्रू नुकसानीच्या दाव्याचे मी स्वागतच करेन ; प्राजक्तताताई धस यांचा जोरदार प्रतिहल्ला

**आष्टी ( प्रतिनिधी )**

बाळासाहेब आजबे यांचे खोटे बोल पण रेटून बोल असे धोरण आहे मी आरोप केलेल्या एकाही आरोपाचे त्यांनी उत्तर दिलेले नाही त्यांनी जमिनी घेतलेल्या गावांची यादी सांगितली होती त्यातील एकाही गावातील जमिनी बाबत कागदपत्र दाखवले नाहीत माझी बदनामी करून माझ्याच विरुद्ध अब्रु नुकसानीचा दावा दाखल करणाऱ्या बाळासाहेब आजबे यांच्या या दाव्याचे मी स्वागतच करीन असा जोरदार प्रति हल्ला प्राजक्ता ताई धस यांनी केला आहे.



आष्टी येथे प्रसार माध्यमांशी त्या बोलत होत्या यावेळी सुवर्णाताई गिर्हे, शीतल कर्डिले आणि आशा करांडे या उपस्थित होत्या.त्यापुढे म्हणाल्या आष्टी येथील सर्वे नंबर 176 आणि 177 या जमिनी पूर्वीच्याच वर्ग-1 असून त्या खिदमतमास वर्गातील नसून मदतमास वर्गातीलच होत्या त्यामुळे रीतसर खरेदी करण्यात आलेल्या आहेत.त्याविषयी कोणाची तक्रार नाही तर राघापूर येथील जमिनीला कुळ असणाऱ्यांकडे नियमाप्रमाणे आवश्यक असणारे 32 ग चे प्रमाणपत्र नसल्यामुळे ते कुळ सिद्ध होऊ शकलेले नाहीत.ती जमीन देखील मालकांकडून रितसर खरेदी करुन घेतलेली आहे. त्यामुळे आजबेनी पत्रकार परिषद घेऊन दाखवलेले कागद देखील चुकीचे आहेत तवलवाडी वाळुंज ही गावे जवळ आहेत वाळुंज येथील रघुनाथ पवार हे आमचे कार्यकर्ते असल्यामुळे त्यांनी फोन केल्यामुळे मी त्या ठिकाणी गेले होते.परंतु याबाबत मोठे षडयंत्र रचण्यात आले, ते नंतर सिद्ध झाले आहे.तुम्ही बाजारातून आला नाहीत असे म्हणता परंतु तुम्ही अदृश्य हातांमुळेच आमदार झाला होता.पाच वर्षात स्वतःच्याच प्रगतीत गुंतल्यामुळे काहीच काम न केल्यामुळे पाच वर्षात ही एक लाख मते अदृश्य झाली आहेत याबाबत आपण काहीही उत्तर दिलेले नाही आणि देवूच शकत नाहीत असा माझा दावा असल्याचेही धस म्हणाल्या.

दुष्काळी मोर्चात तुम्ही माझे नाव घेतले नाही असे म्हणता पण तुम्ही कोणत्याही महिलेचे नाव घेतल्यास मी ते सहन करणार नाही,असा इशारा देत

दादेगाव येथील रामचंद्र देवस्थान हे ऐतिहासिक पौराणिक संदर्भ असलेले देवस्थान असून रामदास स्वामींनी येथील श्री प्रभू रामचंद्र आणि मारुती मंदिर या देवतांची स्थापना केलेली आहे. आपण आणि आपल्या शिराळ गावातील शेतकरी शेकडो एकर जमीन फुकट खात आहात,छत्रपती शिवाजी महाराजांनी या देवस्थानासाठी शेकडो एकर जमीन दिवाबत्तीसाठी दिलेली आहे.देवस्थानला दिलेली आहे, आपण चुकीचे कागदपत्र दाखवत आहात आपल्या चुकीच्या मार्गदर्शनामुळे हे शेतकरी देवस्थानला एक रुपया देखील देणगी देत नाहीत. त्यामुळे या मंदिरांची दुरावस्था झालेली आहे. याला केवळ आपण जबाबदार आहात आम्हाला या देवस्थानाच्या ट्रस्टी होण्यामध्ये अजिबात इंटरेस्ट नाही.मात्र पुरातन मंदिराचा विकास व्हावा हाच आमचा उद्देश आहे, या उद्देशानेच आम्ही ट्रस्टला मदत करत आहोत. याचाच तुम्हाला राग येत असेल तसेच बाळासाहेब आजबे यांचे आणखी एक अज्ञान या निमित्ताने दिसून आले ते म्हणजे पिंपळेश्वर देवस्थान संस्थानच्या मालकीची अनिशा ग्लोबल शाळा आहे. आमच्या कुटुंबाच्या मालकीची नाही, याबाबत अधिक माहिती घ्यावी आणि त्यानंतरच आरोप करावेत असे सांगत एवढे करून बाळासाहेब आजबे करणार असलेल्या अब्रू नुकसानीच्या दाव्याचे आपण स्वागतच करू असेही प्राजक्तताताई धस यांनी शेवटी सांगितले

# जमाअत-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्रकडून CJP ला पाठिंबा ; SIR रद्द करण्याची आणि मतदार यादीतून वगळलेली नावे पुन्हा समाविष्ट करण्याची मागणी

**परळी | प्रीतीनिधी**

जमाअत-ए-इस्लामी हिंद (JIH) महाराष्ट्राचे अध्यक्ष मौलाना इलियास खान फलाही यांनी CJP ला संघटनेचा पाठिंबा जाहीर केला असून, मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकन (SIR) प्रक्रियेबाबत, मतदारांची नावे वगळली जाण्याबाबत आणि निवडणुकीतील गैरप्रकारांच्या आरोपांबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी या प्रकरणी उत्तरदायित्व निश्चित करण्याची, मतदानाच्या अधिकाराचे संरक्षण करण्याची आणि निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता व पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली.



याबाबत अधिक स्पष्टपणे बोलताना मौलाना इलियास खान म्हणाले, "मतदानाचा अधिकार हा लोकशाही प्रक्रियेतील जनसहभागाचा एक मूलभूत आधारस्तंभ आहे. मतदार यादीतून मतदारांची नावे वगळली जाणे आणि SIR प्रक्रियेच्या अंमलबजावणीबाबत उपस्थित झालेल्या शंकांचे पारदर्शकपणे निरसन होणे आवश्यक आहे. प्रत्येक पात्र मतदाराला आपल्या मतदानाच्या अधिकाराचा वापर करण्याची संधी मिळाली पाहिजे. तसेच, कोणत्याही प्रकारच्या अनियमिततेबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची कायदेशीर प्रक्रियेनुसार चौकशी केली गेली पाहिजे."

जमाअत-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्राचे अध्यक्ष पुढे म्हणाले, "या चिंतांच्या पार्श्वभूमीवर जमाअत-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्र मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या तात्काळ राजीनाम्याची मागणी करते. तसेच, त्यांच्यावरील आरोपांची कायद्यानुसार चौकशी करण्यात यावी आणि जिथे आवश्यक असेल तिथे योग्य कायदेशीर कारवाई केली जावी. ज्या पात्र मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत, त्यांची नावे पुन्हा समाविष्ट करण्यात यावीत, सुरू असलेली SIR प्रक्रिया थांबवण्यात यावी आणि ज्या मतदारसंघांमध्ये विश्वासार्ह चौकशीतून निवडणुकीतील गैरप्रकार सिद्ध होतील, तिथे पुन्हा निवडणुका घेण्यात याव्यात, अशीही आमची मागणी आहे."

ते पुढे म्हणाले की, संघटना नागरिकत्व सुधारणा कायदा (CAA) रद्द करण्याची तसेच प्रस्तावित राष्ट्रीय नागरिक नोंदणी (NRC), राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी (NPR) आणि त्यासंबंधित इतर उपाययोजना रद्द करण्याचीही मागणी करते. SIR प्रक्रियेबाबतच्या चिंतांचा विचार नागरिकत्व, समानता आणि मतदानाचा अधिकार यांवर होणाऱ्या परिणामांच्या व्यापक संदर्भात केला गेला पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

जमाअत-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्राने निवडणूक प्रशासनात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कायदेशीर प्रक्रियेचे महत्त्व पुन्हा अधोरेखित केले असून, प्रत्येक पात्र नागरिकाच्या लोकशाही अधिकारांचे संरक्षण करण्याची मागणी केली आहे.

# शालेय विभागीय तायक्वांदो स्पर्धेत प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कूल आमणीची दमदार कामगिरी



**महागांव** | क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा परिषद, अकोला तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागीय स्तरीय शालेय तायक्वांदो क्रीडा स्पर्धाअकोला येथे दि. ३० सप्टेंबर व १ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या शालेय विभागीय तायक्वांदो स्पर्धेत प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कूल, आमणीच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करत शाळेचे नाव उज्ज्वल केले.

या स्पर्धेत १४ वर्षे वयोगटातील ३८ ते ४१ किलो वजन गटात शिवम किशोर जाधव याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली आणि रौप्यपदक (Silver Medal) पटकावले. तसेच याच वयोगटातील शरयू किशोर जाधव हिनेही आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर अंतिम फेरीपर्यंत धडक मारत रौप्यपदक मिळविले.

दोन्ही विद्यार्थ्यांनी विभागीय स्तरावर केलेल्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांचे जिल्हाभरातून कौतुक होत आहे. त्यांच्या यशामुळे प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कूल, आमणीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
• बीड, रविवार, 4 ऑक्टोबर 2026

# वीजखंडितीचा प्रश्न कायमचा सोडवा'; सभापती सौ.अंजलीताई माळी-लोखंडेंची आक्रमक मागणी!

## प्रभाग क्र . ६ मधील वीजखंडितीचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवा ;नगर परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती सौ .अंजलीताई माळी-लोखंडे यांचा इशारा

## वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक त्रस्त ; तातडीने तांत्रिक उपाययोजना करण्याची मागणी

### वीजखंडितीने नागरिक त्रस्त; अंजलीताईंचा महावितरणला 'अल्टिमेटम'!

**प्रभाग क्र. ६ मधील नागरिकांना वारंवार वीजखंडितीचा त्रास सहन करावा लागत आहे. महावितरणने तातडीने उपाययोजना करून वीजपुरवठा सुरळीत न केल्यास नागरिकांच्या रास्त मागण्यांसाठी महावितरण कार्यालयासमोर लोकशाही व सनदशीर मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सौ.अंजलीताई माळी-लोखंडे यांनी दिला.**



**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :**

परळी शहरातील प्रभाग क्र. ६ मध्ये वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा तात्काळ सुरळीत करून वीजखंडितीचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा, अशी मागणी नगर परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती अंजलीताई माळी-लोखंडे यांनी केली आहे. वारंवार वीजखंडित होऊन अनेकदा तासनतास वीज बंद राहत असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. महावितरणने तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक तांत्रिक उपाययोजना न केल्यास ना.पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला.

परळी वैजनाथ शहरातील प्रभाग क्र. ६ अंतर्गत तुळजा नगर, सावता माळी मंदिर परिसर, खंडोबा नगर, सिद्धेश्वर नगर, गंगासागर नगर, कृष्णा नगर आदी मोठ्या लोकवस्तीचे भाग येतात. या परिसरात दिवसातून अनेक वेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच लघु व्यावसायिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. दुष्काळजन्य परिस्थितीत पाणीपुरवठ्यासह नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरही वीजखंडितीचा परिणाम होत आहे. दाऊतपूर फिडरमधून सिद्धेश्वर नगर, गायत्री डीपी, राऊत डीपी व वेताळ डीपी हे भाग वगळून शहरातील फिडरला जोडावेत, अशी मागणी अंजलीताई माळी-लोखंडे यांनी केली आहे. संबंधित फिडरचे तातडीने मेंटेनन्स करून तांत्रिक तपासणी करावी. बिघाड झाल्यास वीजपुरवठा त्वरित सुरू करता यावा यासाठी स्पेअर अथवा पर्यायी चार्ज लाईनची व्यवस्था करावी, अशीही मागणी त्यांनी केली.

वीजखंडित होण्याची कारणे शोधून त्याबाबत तांत्रिक अहवाल तयार करावा व कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात. फ्युज कॉलसाठी जबाबदार व सक्षम कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून नागरिकांच्या तक्रारींवर तात्काळ प्रतिसाद देण्याच्या सूचना द्याव्यात. फ्युज कॉलसाठी दिलेल्या क्रमांकावर तक्रारी करूनही समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याच्या तक्रारींची चौकशी करून दोष आढळल्यास नियमानुसार कार्यवाही करावी, अशी मागणीही त्यांनी केली. परिसरातील संपूर्ण विद्युत यंत्रणेची पाहणी करून आवश्यकतेनुसार नवीन डी.पी., केबल, वाहिनी व इतर तांत्रिक साधने उपलब्ध करून वीजपुरवठा सक्षम करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. रात्रीच्या वेळी वारंवार वीज बंद राहत असल्याने परिसरातील सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

# मराठवाडा पदवीधर निवडणुकीच्या रणांगणात अंकुशराव शिंदे!

## बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र, सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी ५ ऑक्टोबरला छत्रपती संभाजीनगर येथे उमेदवारी अर्ज दाखल करणार

**अंबाजोगाई| प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र तथा राज्य पोलीस दलातील अग्रगण्य नाव म्हणून ओळख निर्माण केलेले सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी अंकुशराव शिंदे हे छत्रपती संभाजीनगर-मराठवाडा पदवीधर विधान परिषद निवडणुकीच्या रणांगणात उतरणार असल्याची माहिती समोर आली आहे. सोमवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील आयुक्तालय कार्यालयात ते आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे समजते. त्यांच्या उमेदवारीमुळे मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीच्या राजकीय वातावरणात नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे.

मराठवाड्यातील पदवीधर तरुणांच्या विविध प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याची भावना पदवीधरांमध्ये निर्माण झाली आहे. सत्ताधारी असो अथवा विरोधक, पदवीधरांच्या अपेक्षांना अपेक्षित न्याय मिळाला नाही, अशी नाराजी व्यक्त होत आहे. गेल्या तीन टर्मपासून विद्यमान आमदारांकडून पदवीधरांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोपही केला जात आहे. सत्तेत असतानाही उपेक्षा आणि सत्ता नसतानाही उपेक्षा, अशीच भूमिका आतापर्यंत राहिल्याची भावना अनेक पदवीधरांमध्ये असल्याचे बोलले जात आहे.

■ **पदवीधर तरुणांचा नवा चेहरा देण्याचा आग्रह**

आत्तापर्यंत ज्या लोकांवर पदवीधरांनी विश्वास दाखविला, त्यांच्याकडूनच अपेक्षाभंग झाल्याची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे यावेळी प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या व्यक्तीने पदवीधरांच्या प्रश्नांसाठी पुढे यावे, अशी अपेक्षा मराठवाड्यातील पदवीधर तरुणांकडून व्यक्त होत आहे.

याच पार्श्वभूमीवर केज तालुक्यातील होळ गावचे रहिवासी आणि बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र असलेले सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी अंकुशराव शिंदे यांनी ही निवडणूक लढवावी, असा आग्रह मराठवाड्यातील पदवीधर तरुणांकडून केला जात असल्याचे सांगितले जात आहे.

■ **पोलीस दलातील उत्कृष्ट सेवेचा अनुभव**

अंकुशराव शिंदे यांनी राज्य पोलीस दलात दीर्घकाळ सेवा बजावताना विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. त्यांच्या कार्याची पोलीस दलात वाखाणणी झाली असून, त्यांच्या सेवेला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारांनी गौरविण्यात आल्याचे सांगितले जाते. पोलीस दलाच्या माध्यमातूनही त्यांच्या कार्याचा विविध पुरस्कारांनी गौरव करण्यात आला आहे.

कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवताना सामान्य नागरिकांच्या हिताला प्राधान्य देणे, अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे आणि आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहणे, ही त्यांच्या सेवाकाळातील वैशिष्ट्ये राहिली असल्याची भावना त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केली जात आहे. निष्कलंक आणि उत्कृष्ट सेवेसाठी ओळख असलेले अधिकारी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

■ **पदवीधरांच्या जीवनात सकारात्मक बदलाची अपेक्षा**



मराठवाड्यातील पदवीधर तरुणांसमोर रोजगार, शिक्षण, स्पर्धा परीक्षा, शासकीय नोकऱ्या, उद्योग-व्यवसायाच्या संधी तसेच भविष्यातील करिअरचे अनेक प्रश्न आहेत. या प्रश्नांना प्रभावीपणे मांडण्यासाठी आणि पदवीधरांच्या हक्कांसाठी आवाज उठविण्यासाठी अनुभवी नेतृत्वाची गरज असल्याची भावना व्यक्त होत आहे.

अंकुशराव शिंदे यांनी पदवीधर मतदारसंघातून निवडणूक लढविल्यास त्यांच्या प्रशासकीय अनुभवाचा पदवीधरांच्या प्रश्नांसाठी उपयोग होऊ शकतो, अशी अपेक्षा त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केली जात आहे. त्यांच्या उमेदवारीमुळे पदवीधर तरुणांमध्येही नव्या नेतृत्वाबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

■ **५ ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज दाखल करणार**

दरम्यान, सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी अंकुशराव शिंदे हे सोमवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयुक्तालय कार्यालयात आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती मिळाली आहे. त्यांच्या उमेदवारीमुळे आतापर्यंतच्या प्रस्थापित राजकीय समीकरणांना धक्का बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शिंदे हे उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर नेमकी कोणती भूमिका मांडतात, पदवीधरांसाठी कोणते मुद्दे घेऊन ते मैदानात उतरतात आणि निवडणुकीची त्यांची रणनीती काय असते, याकडे आता संपूर्ण मराठवाड्यातील पदवीधरांचे लक्ष लागले आहे.

बीड जिल्ह्याच्या मातीतून राज्य पोलीस दलात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे अंकुशराव शिंदे आता पदवीधरांच्या प्रश्नांसाठी निवडणुकीच्या मैदानात उतरत असल्याने त्यांच्या उमेदवारीची पुढील भूमिका आणि त्याला मिळणारा प्रतिसाद याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ना. पंकजाताई मुंडे यांचा उद्या बीड, पाटोद्यात दुष्काळ पाहणी दौरा ; शेतकऱ्यांना देणार दिलासा



**बीड |** राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे बीड जिल्ह्यात येत असून उद्या (ता. ०४) बीड व पाटोदा तालुक्यातील दुष्काळाची पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा देणार आहेत.

राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केला असला तरी दुष्काळाची भयानकता लक्षात घेता सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना आधार व दिलासा देणे आवश्यक आहे. ना. पंकजाताई मुंडे यासाठी जिल्ह्यात येत असून उद्या दुपारी ३ ते ६.३० वा. दरम्यान त्या दुष्काळ व पीक परिस्थितीची पाहणी करणार आहेत. उद्या बीड तालुक्यातील काकडहिरा, मूर्शदपूर, वंजारवाडी तर

पाटोदा तालुक्यातील पिठ्ठी, रोहतवाडी, थेरला, जवळाला, तांबा राजूरी येथे पाहणी दौरा करणार आहेत, परवा म्हणजे ५ तारखेला त्या वडवणी, धारूर, माजलगांव आणि गेवराई तालुक्यात पाहणी करणार असल्याची माहिती त्यांच्या संपर्क कार्यालयाने दिली आहे.

# शेतकऱ्यांचे प्रश्न अन् व्यथा लेखणीतून मांडणे काळाची गरज : भीमराव धोंडे

## बीड जिल्हास्तरीय शेतकरी लेखक साहित्य संमेलनाचे कडा येथे उत्साहात उद्‌घाटन

**आष्टी | प्रतिनिधी**

शेतकऱ्यांचे जीवन, कष्ट आणि व्यथा हे मराठी साहित्याचे महत्त्वाचे केंद्र राहिले आहे. शेतकरी लेखकांनी सशक्त लेखणीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील वास्तव, शेतीसमोरील प्रश्न तसेच शेतकऱ्यांच्या आशा-आकांक्षा समाजासमोर मांडणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन आष्टी मतदारसंघाचे नेते व माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले.

कडा येथील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालयात आयोजित बीड जिल्हास्तरीय शेतकरी लेखक साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते. महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभाग आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून तसेच आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी संचलित आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजाला दिशा देणारे प्रभावी माध्यम आहे. ग्रामीण भागातील प्रतिभावंत लेखकांना व्यासपीठ मिळावे आणि साहित्याच्या माध्यमातून संस्कृतीचे जतन व्हावे, यासाठी




जिल्हास्तरीय शेतकरी लेखक साहित्य संमेलन महत्त्वपूर्ण ठरते, असे भीमराव धोंडे यांनी सांगितले.

या कार्यक्रमास दमयंतीताई (माईसाहेब) धोंडे, महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. अजय दादा धोंडे, चेअरमन राजेंद्र काका धोंडे, ह.भ.प. आंधळे महाराज आणि भाजपचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आरपीआय (आठवले) आष्टी तालुकाध्यक्ष अशोक साळवे, सेवानिवृत्त सचिव सुनील चव्हाण, सतीश साळुंखे, श्रीपाल सबनीस, प्रदीप ढवळ, श्रीधर नांदेडकर, डॉ. एम. डी. पाटील, प्रा. अनंतराव हंबर्डे, प्रा. भास्कर बडे, सरपंच दादासाहेब जगताप, सरपंच भीमराव पाटील, बबनराव औटे, माजी सरपंच संतोष भैया चव्हाण, बाबुसेठ भंडारी, प्रा. डॉ. सय्यद अल्लाउद्दीन, ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव बोडखे, पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे आणि प्राचार्य डॉ. हरिदास विधाते आदी उपस्थित होते.

संमेलनात विविध साहित्यविषयक सत्रांचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, पत्रकार, साहित्यप्रेमी नागरिक आणि शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले.